Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक १८] मंगळवार, एप्रिल २६, २०२२/वैशाख ६, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६९.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक सं.क्र.-जिकाभं-अका-जिपपंसनि-२०२१-कावि-१११-२०२२.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना असाधारण क्र. ४१७ क्रमांक जिपनि, २०१८-प्र.क्र.२१८(२)-पंरा-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २ ई च्या तरतुदीनुसार अडीच वर्षाच्या कालावधीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलासह) राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतीच्या राखून ठेवावयाच्या पदांची संख्या विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना असाधारण क्र. ४१७ क्रमांक जिपनि, २०१८-प्र.क्र.२१८(२)-पंरा-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये अडीच वर्षाच्या कालावधीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलासह) उक्त नियमातील २ फ यातील तरतुदीनुसार पंचायत समित्यांच्या सभापतीच्या पदाचे अनुसूचितील अनुक्रमांक ३० नुसार भंडारा जिल्ह्याकरीता सभापती पदांची संख्या विनिर्दिष्ट करून वाटप केले आहे.

तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक जिपनि, २०२२-प्र.क्र.३१ अ-पंरा-२, दिनांक १२ एप्रिल, २०२२ नुसार मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र. ९८०/२०१९, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व रिट याचिका क्र. ८४१/२०२१ यांमधील आदेश लक्षात घेता नागरिकांच्या मागास प्रवर्गातील पंचायत समिती सभापती, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्या मृत्यू अथवा राजीनामा यामुळे रिक्त झालेली पदे तसेच आगामी काळातील उपरोक्त नमूद पदांच्या प्रस्तावित निवडणुका या सर्वसाधारण प्रवर्गामधून भरण्याबाबतचे निर्देशित केले आहे.

त्याअर्थी, मी, संदीप कदम, जिल्हाधिकारी, भंडारा उक्त नियमातील नियम २ फ च्या पोट-नियम (२) ते (५) च्या तरतुदीनुसार जिल्ह्यातील ७ पंचायत समित्यांमध्ये अडीच वर्षाच्या कालावधीसाठी सभापतीच्या आरक्षित पदांचे आरक्षण दिनांक २२-०४-२०२२ रोजी काढण्यात आलेल्या पंचायत समिती सभापती पदाच्या आरक्षण सोडतीमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे आरक्षित झाल्याचे याद्वारे खाली नमूदप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | पंचायत समिती | सभापती पदासाठी आरक्षित पदाचा प्रवर्ग |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | तुमसर | सर्वसाधारण |
| २ | मोहाडी | अनुसूचित जाती |
| ३ | साकोली | सर्वसाधारण |
| ४ | लाखनी | सर्वसाधारण महिला |
| ५ | भंडारा | सर्वसाधारण महिला |
| ६ | पवनी | सर्वसाधारण महिला |
| ७ | लाखांदुर | अनुसूचित जमाती (महिला) |

भंडारा :
दिनांक २२ एप्रिल २०२२.

**संदीप कदम,**
जिल्हाधिकारी,
भंडारा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.